


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ४५, शनिवार ४ जानेवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# घडा भरला ! निघोजच्या धोंड्या टोळीला मोक्का !!

## ■ मिथुन उंबऱ्या काळेचाही समावेश ■ जिल्ह्यातील २७ जणांना मोक्का ■ १७ सराईत एमपीडीएन्वये नाशिक कारागृहात स्थानबध्द

नगर : विशेष प्रतिनिधी

**निघोजच्या जत्रा हॉटेल मालकावर सशस्त्र हल्ला, शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथील बँक ऑफ महाराष्ट्राची रोख रक्कम तसेच दागिण्यांची लुट, साकूर ता. संगमनेर येथील सराफाची लुट यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा मास्टरमाईड असलेल्या निघोजचा धोंड्या व त्याच्या टोळीचा घडा भरला आहे ! त्यांच्यावर मोक्कांतर्गत कारवाई करण्यात आली असून तालुक्यातील मिथुन उंबऱ्या काळे याचाही त्यात समावेश आहे. दरम्यान जिल्ह्यातील एकूण २७ गुन्हेगारांविरोधात मोक्कांतर्गत कारवाई करण्यात आली असून १७ सराईत गुन्हेगारांना एमपीडीएन्वये नाशिक कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.**

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहीतीनुसार पारनेर, सुपा पोलीस ठाणे तसेच नगर शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार, कॅम्प, नगर तालुका, एमआयडीसी, श्रीगोंदे, बेलवंडी, जामखेड, संगमनेर शरह, अश्वी, शिर्डी, कोपरगांव शहर व तालुका पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १७ गुन्हेगारांकडून वाळू तस्करी, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी यासह अग्निशस्त्र व घातक शस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, शासकीय कामात अडथळा निर्माण होईल असे गंभीर गुन्हे केले जात होते. त्यांना सर्वसामान्य लोकांवर दहशत निर्माण करून सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आणली होती.

या गुन्हेगारांच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलीत कायद्यान्वये करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवाया अपुऱ्या तसेच कुचकामी ठरत होत्या. त्यावर त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी एमपीडीए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करू उपविभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधिकाऱ्यांनी एमपीडीए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करून उपविभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आले होते.

चार टोळयांसह २७ सराईत गुन्हेगारांविरोधात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ च्या कलमांतर्गत प्रस्ताव तयार करून नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या पाठविण्यात आले होते. त्यांनी या टोळयांवर मोका कायद्यान्वये कारवाई केली.गेल्या वर्षभरात अधिक्षक ओला यांनी गुन्हेगारांवर केलेल्या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.




### १७ गुन्हेगार स्थानबध्द

पोलीस अधीक्षक ओला यांनी आलेल्या प्रस्तावांची छानणी व पडताळणी करून हे प्रस्ताव शिफारस अहवालासह जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे पाठविले. जिल्हाधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी १७ गुन्हेगारांना एक वर्षासाठी नाशिक कारागृहात स्थानबध्द केले.

### चार टोळयांना मोक्का

सन २०२४ मध्ये संघटीतपणे टोळीने गैर कायद्याची मंडळी जमउन अग्निशस्त्रासह खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणे, चोरी करणे, जबरी चोरी करणे, सरकारी नोकरास मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, अग्निशस्त्र, घातक हत्यार जवळ बाळगणे अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या चार टोळयांविरोधात मोक्का कायद्यांन्वये कारवाई करण्यात आली.

### हे आहेत टोळयांचे म्होरके !

निघोज, ता. पारनेर येथील जत्रा हॉटेलवर जेवणाच्या बिलाच्या कारणावरून तलवार, लाकडी दांडके व कोयत्याने गंभीर जखमी करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या सागर उर्फ धोंडया महादू जाधव, सुपा, पारनेर येथील मिथुन उंबऱ्या काळे, तिसगांव, ता. पाथर्डी येथील मच्छिंद्र तुकाराम ससाणे यांच्या घरावर दरोडा टाकून हत्या करणारे उमेश रोशन भोसले या टोळयांवर मोक्कांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

### मास्टरमाईड धोंड्या मात्र फरार !

धोंडयाच्या टोळीने शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथील महाराष्ट्र बँकेवर पिस्तुलाचा धाक दाखवत दिवसा ढवळ्या दरोडा टाकला होता. त्यात कोटयावधी रूपयांची रोकड तसेच सोने लुटून नेण्यात आले होते. शिरूर पोलीसांनी धोंडयाला निघोज परिसरातून मुद्देमालासह जेरबंद केले होते. या गुन्ह्यातून सुटून आल्यानंतर त्याचे उद्योग पुन्हा सुरू झाले. निघोज येथील जत्रा हॉटेल चालकावर प्राणघातक हल्ल्यानंतर धोंडया व त्याची टोळी पसार होती. त्याच दरम्यान त्यांनी साकूर ता. संगमनेर येथील सराफाला अलीकडेच लुटले होते. त्यातील काहींना जेरबंद करण्यात आले असले तरी मास्टरमाईड धोंडया मात्र फरार आहे.

### धोंडयाच्या टोळीची दहशत

निघोज परिसरात धोंडयाच्या टोळीची दहशत आहे. जवळे, निघोज पासून देवीभोयरे फाटयापर्यंतचे अवैध व्यवसायिक, हॉटेलचालक यांच्याकडून दरमहा खंडणी वसुलीचे काम या टोळीकडून करण्यात येत होते. जत्रा हॉटेलवरील मारहाणीनंतर ही वसुली बंद झाली असली तरी टोळीची दहशत मात्र कायम आहे. टोळीवर मोक्कांतर्गत कारवाई झाल्याने व्यवसायिकांनी मात्र सुटकेचा श्वास सोडला आहे.

# मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी ३० रूग्ण रवाना

## ■ खासदार नीलेश लंके यांनी दिल्या शुभेच्छा ■ १२ डिसेंबरपासून सुरू आहे शिबिर



■ मोफत नेत्र तपासणी, चष्मा वाटप तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात मोतीबिंदूचे निदान झालेल्या ३० रूग्णांच्या पाहिल्या गटाला खा. नीलेश लंके यांनी हंगे येथून निरोप दिला.सुगंधीत तंबाखू तसेच वाहने असा सात लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.होण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर शिवसैनिकांनी मोठे मताधिक्क्य देण्याचा निर्धार केला.यांच्या उपस्थितीत कार्यान्वीत करण्यात आला.

हंगा : प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा.नीलेश लंके व राणी लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठाण व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने गेल्या २२ दिवसांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या नेत्र तपासणी शिबिरात मोतीबिंदूचे निदान झालेल्या पहिल्या ३० रूग्णांना शस्त्रक्रियेसाठी शुक्रवारी पुण्याकडे रवाना करण्यात आले. खा. नीलेश लंके यांनी या रूग्णांना शुभेच्छा देत निरोप दिला.**

यावेळी बोलताना खा. लंके यांनी सांगितले की, गेल्या २२ दिवसांत १९ हजार ५०० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १६ हजार ५०० रूग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. २ हजार २०० रूग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यापैकी पाहिल्या ३० रूग्णांना आज पुण्याकडे शस्त्रक्रिया करण्यासाठी रवाना करण्यात येत आहे. शस्त्रक्रियेसाठी पुण्यातील देसाई हॉस्पिटलशी करार करण्यात आला असून तिथे या रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

खा. लंके पुढे म्हणाले, गेल्या २२ दिवसांमध्ये विविध गावांमध्ये घेण्यात आलेल्या या शिबिरास अत्यंत चांगला प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागात विशेषतः ज्येष्ठ नागरीकांची साधारणतः दहा वर्षापूर्वी डोळे तपासणी करण्यात आलेली असते. दहा वर्षापूर्वीचाच चष्मा दोरी लाऊन कसातरी वापरण्याचा प्रयत्न ज्येष्ठ नागरीक करतात हे आपण पाहतो. त्यामुळे नगर दक्षिण मतदारसंघात किमान एक लाख रूग्णांची तपासणी करून त्यांना मोफत चष्मा वाटप व मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला असल्याचे खा. लंके म्हणाले.

आज तालुक्यातील ज्येष्ठ मंडळी मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी जात असून नीलेश लंके प्रतिष्ठाणचे सर्व पदाधिकारी तसेच डॉ. बाळासाहेब कावरे यांनी परिश्रम घेत खेडया पाडयांतील वंचितांना, गरीबांना या शिबिराचा लाभ कसा होईल याची काळजी घेतली असल्याचे सांगत लंके यांनी आपल्या सहकार्यांचे कौतुक केले.

### लोकसभा मतदारसंघात शिबिरे


येत्या ५ जानेवारी रोजी पारनेर-नगर मतदारसंघातील शिबिराचा समारोप होणार असून त्यानंतर पाथर्डी-शेवगांव मतदारसंघात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर सोईने श्रीगोंदे-नगर, राहुरी-पाथर्डी-नगर, कर्जत-जामखेड व नगर शहरात शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### रूग्णांसाठी सर्व सुविधा

मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे निदान झालेल्या रूग्णांना पारनेरहून बस, पुण्यात पोहचल्यानंतर निवास, जेवण, औषधे, शस्त्रक्रिया या सर्व सुविधा मोफत देण्यात येणार असून तिसऱ्या दिवशी या रूग्णांना पुन्हा पारनेर येथे आणण्याची सोय नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आली आहे.

# भाऊसाहेब कचरे यांच्या नावावर हातोडा!

## माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या शाखेचे उदघाटन वादाच्या भोवऱ्यात । शनिवारी उदघाटन, कोनशिला फोडली




पारनेर : प्रतिनिधी

**नगर जिल्हा माध्यमिक शिक्षकांची आर्थिक संस्था असणारी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या पारनेर शाखेच्या शनिवारी होणा- या उद्घाटन सोहळ्याची कोनशिला फोडून सेवानिवृत्त संचालक भाऊसाहेब कचरे यांच्या कोनशिलेवरील नावाला तीव्र विरोध दर्शविण्यात आला. शिक्षक नेते व संचालक आप्पासाहेब शिंदे, महेंद्र हिंगे यांनी फोडल्याने उद्घाटन आधीच वाद पेटला आहे.**

नगर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षक सोसायटीचे पारनेर शाखेचे उद्घाटन शनिवारी होणार आहे. या संस्थेचे सेवानिवृत्त संचालक भाऊसाहेब कचरे यांचे उद्घाटनाच्या कोनशिलेमधील नावावरून विरोधी संचालक व शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे, संचालक महेंद्र हिंगे यांनी शुक्रवारी थेट पारनेर येथील माध्यमिक शिक्षक सोसायटी शाखेचे कार्यालय गाठले आणि भाऊसाहेब कचरे यांचे कोनशिलेवरील नाव हातोडी ने फोडले व निषेध केला.

शिक्षक भाऊसाहेब कचरे हे निवृत्त झाले मुळे त्यांचें नाव कोनशिलेमध्ये टाकण्याचा प्रश्न येत नसल्याने आम्ही त्यांच्या नावाची कोनशिला फोडल्याचे शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे व संचालक महेंद्र हिंगे यांनी सांगितले यावेळी संचालक बाबासाहेब बोडखे,प्राचार्य अर्जुन भुजबळ, उपप्राचार्य शिवाजी सावंत, बापुराव होळकर,, अमोल ठाणगे, मंगेश काळे, जयवंत पुजारी, विजय पठारे आदीसह शिक्षक उपस्थित होते.

### तर कार्यक्रम उधळून लावू

माध्यमिक शिक्षक सोसायटी शाखेचे पारनेर शाखेच्या उदघाटन कोनशिलेवरील नावावरून वादंग निर्माण झाल्यामुळे अध्यक्ष सत्यवान थोरे व संचालक अशोक ठुबे यांच्या समोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. शनिवारी उदघाटन कार्यक्रमात सेवा निवृत्त शिक्षक भाऊसाहेब कचरे यांचें नाव पुन्हा टाकल्यास उदघाटन कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा शिक्षक नेते संचालक आप्पासाहेब शिंदे, महेंद्र हिंगे यांनी केला आहे.

# वाल्मिक कराडला कोर्टाचा दणका ! मदतनीस देण्याची मागणी फेटाळली

बीड :प्रतिनिधी

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुह्यात वाल्मिक कराड सध्या सीआयडी कोठडीत आहे. वाल्मिक कराडने कोर्टाकडे अर्ज करत खास सुविधेसाठी हात जोडले होते. मात्र, कोर्टाने वाल्मिक कराडला दणका दिला आहे. तुरुंगात आहात, त्यामुळे शासकीय सुविधाच वापरण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत.**

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याने कोर्टाकडे आपल्या जीवाला धोका असल्याचे सांगत तुरुंगात २४ तास मदतनीसाची मागणी केली आहे. वाल्मिक कराडने आपल्या आजारपणाचे कारण देत ही मागणी केली आहे. वाल्मिक कराडने आपल्यासाठी मदतनीस कोण असावा, याचे नावही कोर्टाला दिले होते. वाल्मिक कराडच्या विनंती अर्जावर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी आपला निकाल सुनावला आहे. न्यायालयाने काय म्हटले?



वाल्मिक कराडच्या अर्जावर न्यायालयाने केवळ शासकीय व्यक्तीकडून मिळणार सुविधा मिळणार असल्याचे स्पष्ट केले. आपल्याला स्लीप ॲपनिया नावाचा आजार झाला असल्याचा दावा वाल्मिक कराडने आपल्या अर्जात केला होता. याच आजारातील उपचाराचा एक भाग म्हणून खाजगी व्यक्ती काळजीवाहू म्हणून देण्याची विनंती वाल्मिक कराडने केली होती. या आजारातील उपचारासाठी सी पॅप मशीन उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

**सोशल मीडियावरून व्यक्त होणाऱ्या प्रत्येकीला हक्काचे व्यासपीठ मिळाले असल्यामुळे आपल्या आवडीचे फोटो, मते मांडण्याची, लोकांशी जोडण्याची संधी तिला याद्वारे मिळाली आहे. एकीकडे सोशल मीडियाचे स्वातंत्र्य अनुभवत असताना दुसरीकडे मात्र महिलांना या व्हर्च्युअल जगातही सावधगिरीने वागावे लागत आहे. सोशल मीडियाशी संबंधित घडणाऱ्या गुन्ह्यांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास सायबर गुन्हेगारांकडून त्यांनाच सर्वाधिक लक्ष्य केल्याचे दिसून येत आहे.**


## महिलांना 'सोशल' उपद्रव!






माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, व्हॉट्सअॅपचा वापर करणाऱ्यांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सोशल मीडियाचा वापर करण्यात महिलांचे प्रमाण वाढत आहे. सोशल मीडियावर महिलांना व्यक्त होण्यासाठी, विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. पण, या सोशल मीडियाच्या व्हर्च्युअल जगात महिलांकडून व्यवस्थित काळजी न घेतल्यामुळे त्या सायबर गुन्हेगारांचे लक्ष्य ठरत चालल्या आहेत. फेसबुकवर टाकलेले फोटोचा गैरवापर करून त्रास देणे, बनावट अकाउंट काढून अश्लील पोस्ट टाकणे, इन्स्टाग्रामवरील फोटो चोरून मॉर्फ करत त्रास देणे, सोशल मीडियावर मोबाइल क्रमांक टाकणे, मॅट्रीमोनी साइटवरून फसवणूक, व्हॉट्सअॅपवर अश्लील फोटो पाठवून त्रास देणे अशा प्रकारच्या त्रासाला महिलांना सामोरे जावे लागत आहे. प्रत्येक वर्षीच अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत सायबर सेलच्या तक्रारीवरून दिसून येत आहे. बनावट प्रोफाइल, बदनामीकारक मजकूर टाकणे असे सर्वाधिक प्रकार आहेत. त्यानंतर अकाउंट हॅक करून फोटो, माहिती चोरणे, त्याचा खंडणी मागण्यासाठी वापर करणे असे प्रकार समोर आले आहेत. सोशल मीडियावरून ओळख झाल्यानंतर महिलांना फसविण्याचे प्रकार वाढत आहेत. तसेच, मॅट्रीमोनी साइटवर बनावट प्रोफाइल तयार करून विवाहाच्या बहाण्याने महिलांकडून कोट्यवधी रुपये उकळून फसवणूक केली जात आहे.

### पुढे येऊन तक्रार करा



- एकतर्फी प्रेम, सूडभावनेतून बदनामी करणे यातूनदेखील महिलांना सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रास देण्याचे प्रकार घडत आहेत. या गुन्ह्याचा तपास केल्यानंतर आरोपी हा महिलेशी परिचित अथवा जवळचीच व्यक्ती असल्याचे बहुतांश वेळा आढळून येते. अशा वेळी महिला घाबरून अथवा दबावाखाली तक्रार देण्यासाठी पुढे येत नाहीत. मात्र, अशा प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी महिलांनी खंबीरपणे तक्रार करावी. अशा आरोपींचा पोलिसांकडून बंदोबस्त केला जाईल, असे आवाहन सायबर सेलकडून करण्यात आले आहे.
- सोशल मीडियाचा वापर करताना महिलांनी विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अनोळखी व्यक्तींला खासगी माहिती देणे महिलांनी टाळावे. अलीकडे मॅट्रीमोनी साइटवरून महिलांच्या फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. महिलांनी प्रत्यक्ष भेटल्याशिवाय त्या व्यक्तीशी आर्थिक व्यवहार करू नये. तसेच, कोणी त्रास देत असेल तर सायबर सेलकडे येऊन तत्काळ तक्रार करावी, असे आवाहनही सायबर सेलकडून करण्यात आले आहे.


### ही काळजी घ्या

- सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तीशी मैत्री करू नका.
- प्रोफाइल सेटिंगमध्ये जाऊन प्रायव्हसी तपासा.
- अनोळखीला व्यक्तिगत माहिती व फोटो पाठवू नका.
- कोणत्याही आमिषाला बळी पडू नका.
- मॅट्रीमोनी साइटवरून ओळख झालेल्या व्यक्तीला भेटल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नका.

## ९० टक्के लोकांना माहीत नाही लॅपटॉप बंद करण्याची योग्य पद्धत

**लॅपटॉप योग्यरित्या बंद करणे महत्वाचे आहे. जेणेकरून सिस्टम फाईल्स सुरक्षित राहतील, हार्डवेअर खराब होणार नाही आणि डेटा नष्ट होणार नाही. यासाठी स्टार्ट मेनू वापरून सर्व काम सेव्ह करा, प्रोग्राम बंद करा. लॅपटॉप बंद करण्याचा योग्य मार्ग अनेकांना माहीत नसला तरी आज येथे तुम्हाला त्याबद्दल माहिती देत आहोत...**

लॅपटॉपच्या काही सेटिंग्ज आहेत, ज्या सेट केल्याशिवाय पीसी बंद केल्यानंतरही CPU सक्रिय राहतो. यामुळे लॅपटॉपची कार्यक्षमताही मंद होते. लॅपटॉप बंद करताना अनेकजण ही चूक पुन्हा करतात. लॅपटॉप बंद करण्याची योग्य पद्धत आम्ही तुम्हाला सांगत आहोत. तुम्हाला तुमच्या लॅपटॉपचा CPU किती काळ सतत काम करत आहे हे तपासावे लागेल. यासाठी टास्क मॅनेजरमध्ये जाऊन परफॉर्मन्समध्ये जाऊन CPU पर्यायावर क्लिक करा. आता उघडलेल्या विंडोच्या तळाशी UP वेळ दिसेल. ही अशी वेळ आहे ज्यासाठी तुमच्या लॅपटॉपचा CPU सतत काम करत असतो.



### लॅपटॉप बंद करण्यासाठी करा या सेटिंग्ज

लॅपटॉप योग्यरित्या बंद करण्यासाठी, तुम्हाला काही सेटिंग्ज बदलावी लागतील, त्यानंतर तुमचे डिव्हाइस अधिक चांगले आणि जलद काम करण्यास सुरवात करेल. त्याचे आयुष्यही वाढेल. यासाठी तुम्हाला काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील


- लॅपटॉपमधील Control Panel ओपन करा.
- All Control Panel Items वर जा आणि Power Options वर क्लिक करा.
- आता तुम्हाला Choose what the power buttons चा पर्याय निवडावा लागेल.
- आता Change settings that are currently unavailable हा पर्याय निवडा.
- यानंतर Turn On Fast startup चा पर्याय अनचेक करा.
- आता पुन्हा एकदा CPU UP Time चेक करा. तुम्हाला दिसेल की त्याची वेळ 0 पासून सुरू झाली आहे. आता प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही लॅपटॉप बंद कराल तेव्हा CPU देखील काम करणे थांबवेल.


### लॅपटॉप/पीसी थेट बंद करू नका

जर तुम्ही थेट पॉवर बटण दाबून लॅपटॉप बंद करत असाल तर ते चुकीचे आहे. लॅपटॉप योग्यरित्या बंद करणे त्याच्या दीर्घ आयुष्यासाठी आणि चांगल्या कार्यक्षमतेसाठी महत्वाचे आहे. लॅपटॉप चुकीच्या पद्धतीने बंद केल्याने सिस्टम फाईल्स करप्ट होऊ शकतात, हार्डवेअर खराब होऊ शकतात आणि डेटा लॉस होऊ शकतो.

### लॅपटॉप बंद करण्यापूर्वी करा या गोष्टी

- सर्व काम सेव्ह करा : कोणतीही महत्त्वाची फाइल किंवा दस्तऐवज सेव्ह करा. तुम्ही सर्व प्रोग्राम्समध्ये केलेले कोणतेही बदल तुम्ही सेव्ह केले असल्याची खात्री करा.
- सर्व प्रोग्राम्स बंद करा : लॅपटॉप बंद करण्यापूर्वी, सर्व प्रोग्राम्स आणि विंडोज बंद करा. हे डेटा गमावण्याची आणि सिस्टम एररची शक्यता कमी करते.
- स्टार्ट मेनू वापरा : आपण Windows युजर असल्यास, स्क्रीनच्या खालच्या-डाव्या कोपऱ्यात स्टार्ट बटण क्लिक करा. नंतर स्टार्ट मेनूमधील पॉवर बटणावर क्लिक करा.






## सोशल मीडियावरच्या ललना करतील घात

**सोशल मीडियावर आता अर्ध्याहून अधिक जग दिवस रात्र काही ना काही करत असते. लाईक्स, कमेंट्स, पोस्ट असा खेळ सुरू असतो. या अभासी जगात अनेक अनोळखी लोक एकमेकांना भेटतात. पण सोशल मीडियावरील एक चूक महागात पडू शकते. सुंदर मुलीच्या रिक्वेस्टवर अनेकांना आकाश ठेंगणे होते. पण कदाचित येथूनच Honey Trap सुरू होतो. हा सुंदर प्रवास पुढे मायाजालात अडकवतो. तिथे ब्लॅकमेलिंगला सुरुवात होते. अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. तेव्हा सावज होण्याऐवजी सावध व्हा...**

### Cyber Dost ने केले अलर्ट

मायक्रोब्लॉगिंग प्लेटफॉर्म X वर सरकारचे अधिकृत खाते Cyber Dost ने एक पोस्ट करून युझर्सला अलर्ट केले आहे. सोशल मीडियावर हनी ट्रॅपपासून सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यांनी समाज माध्यमावर कोणत्या चुका टाळाव्यात आणि कसे सतर्क राहावे याची माहिती दिली आहे. हनी ट्रॅपमध्ये कसे अडकविण्यात येते याची माहिती दिली आहे.

### हनी ट्रॅप म्हणजे काय ?

हनी ट्रॅप एक मायाजाल आहे. याठिकाणी काही महिलांच्या मध्यस्थीने पुरुषांना फसविण्यात येते. महिला गोडीगुलाबीने पुरुषांना जाळ्यात ओढतात. त्यांचे व्हिडीओ, फोटो शेअर करून, गप्पांद्वारे सावज जाळ्यात ओढण्यात येते. त्यानंतर त्यांना फसविण्यात येते. ब्लॅकमेलिंग करण्यात येते. समाजात, नातेवाईकांमध्ये बदनाम करण्याची धमकी देत त्यांच्याकडून मोठी रक्कम वसूल करण्यात येते.



### समाज माध्यमावर करू नका ही चूक

- सोशल मीडियावर कोणत्याही अनोळखी मुलीच्या जाळ्यात अडकू नका.
- अनोळखी तरुणीशी चॅटिंग करू नका. ही फसवणुकीची सुरुवात असते.
- अनोळखी व्यक्तीशी चॅटिंग करण्यापूर्वी त्या व्यक्तीची माहितीचा पडताळा घ्या.
- सोशल मीडियावर चॅटिंगदरम्यान तरुणी रोमँटिक गप्पांमध्ये ओढत असेल तर सावध व्हा.
- अशा खात्याची लागलीच तक्रार करा. प्रकरण हाताबाहेर जाण्यापूर्वी पोलिसांची मदत घ्या.
- समाज माध्यमावर अनोळखी तरुणीची रिक्वेस्ट स्वीकारू नका अथवा तुम्ही पण पाठवू नका.
- जर एखादी अनोळखी तरुणी सोशल मीडियावर व्हिडिओ कॉल करत असेल तर तो कॉल उचलू नका.
- व्हिडीओ कॉलवर रेकॉर्डिंग करून ब्लॅकमेलिंगचा प्रकार सध्या सुरू आहे.
- सावध राहाल तर हनी ट्रॅप प्रकरणात अडकणार नाहीत. मोहात अडकून फसलात तर सायबर क्राईम नॅशनल क्रमांक 1930 वर कॉल करा.

## लॅपटॉपचा यूएसबी पोर्ट होतोय खराब?

**वाढत्या डिजिटल युगात लॅपटॉप ही प्रत्येक व्यक्तीची गरज बनली आहे. त्यामुळे आजकाल लॅपटॉपचा वापरही खूप वाढला असून त्यात येणाऱ्या समस्याही तितक्याच वाढल्या आहे. अशामध्ये लॅपटॉपमधील यूएसबी पोर्टचे महत्त्वही खूप वाढले आहे. पण अनेक वेळा यूजर्सना या युएसबी पोर्टमध्ये येणाऱ्या समस्यांना सामोरे जावे लागते. जर तुम्हाला देखील तुमच्या लॅपटॉपच्या यूएसबी पोर्टमध्ये समस्या येत असल्यास घरच्या काय कराल ? हे आम्ही तुम्हाला या रिपोर्टमध्ये सांगणार आहोत...**

सर्वसाधारणपणे, यूएसबी पोर्टमधील समस्या इलेक्ट्रिकल ब्रेकडाउनमुळे येत असतात. असं झाल्यानंतर तुमचा लॅपटॉप त्याला अटॅच केलेलं USB डिव्हाईस ओळखू शकत नाही किंवा अटॅच झालं असताना यूएसबी डिव्हाईस फ्रीज होऊ शकतं. अशामध्ये जर तुमच्याकडे योग्य सामग्री असल्यास आणि रिपेअरिंगचा थोडाफार अनुभव असल्यास तुम्ही घरीच हे रिपेअर करू शकता. पण असं नसल्यास तुम्ही रिपेअर करणाऱ्या तज्ञांशी संपर्क साधू शकता.




### या टिप्स लक्षात ठेवा

- सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लॅपटॉपची वॉरंटी तपासली पाहिजे. तुमची वॉरंटी अद्याप संपली नसल्यास, एखाद्या तज्ञाकडून ते तपासा आणि रिपेअर करा. यासाठी तुम्ही नक्कीच सर्व्हिस सेंटरमध्ये जाऊ शकता.
- तुमची वॉरंटी संपली असली तरी तुम्ही सर्व्हिस सेंटर किंवा रिपेअरिंग शॉपमध्ये जाऊन तज्ञांशी मदतीशी संपर्क साधू शकता. फक्त यासाठी तुम्हाला थोडे अधिक पैसे मोजावे लागतील. पण तुम्हाला थोडीफार तांत्रिक माहिती असल्यास स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे पण ते अत्यंत काळजीपूर्वक केले पाहिजे.
- अधिक माहिती नसताना तुम्ही लॅपटॉप स्वतः दुरुस्त करणं टाळायला हवं. कारण असे केल्याने तुमच्या लॅपटॉपची वॉरंटी रद्द होऊ शकते. तसंच कोणतंही डिव्हाईस वापरत असताना ते योग्यप्रकारे अटॅच आणि रिमूव्ह करायला हवं. सेफली रिमूव्हचा एक ऑप्शन असतो तो देखील वापरला पाहिजे.

## पेमेंट ॲप वापरता?

**आज जवळपास प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असल्याने ऑनलाइन पेमेंटचे प्रमाण वाढले आहे. स्मार्टफोनच्या एका क्लिकवर अगदी काही सेकंदांत कोणालाही पैसे पाठवणे आणि रिसिव्ह करणे शक्य आहे. यासाठी गुगल पे, पेटीएम आणि फोन पेसारखे डिजिटल वॉलेट देखील उपलब्ध आहे. ऑनलाइन पेमेंटसाठी अशा ॲप्सचा वापर केला जातो. मात्र, असे ॲप्स वापरताना काळजी न घेतल्यास मोठे नुकसान होऊ शकते. सध्या सायबर फ्रॉडच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे एक चूक देखील तुमचे बँक खाते रिकामे करू शकते. या ॲप्सचा वापर करताना या काळजी घ्यायला हवी त्याविषयी जाणून घेऊया...**

- स्क्रीन लॉक : केवळ स्मार्टफोनच नाही तर असे पेमेंट ॲप्स देखील लॉक असणे गरजेचे आहे. अनेकदा फोन हरवल्यास अथवा चोरीला गेल्यास एखादी व्यक्ती तुमचे बँक अकाउंट रिकामे करू शकते. तसेच, नाव, मोबाइल नंबर आणि जन्मतारखेचा पासवर्ड म्हणून वापर करू नये.
- पिन शेअर करू नका : यूपीआय पिन कोणासोबतही शेअर करू नये. तुमचा यूपीआय पिन इतरांना माहीत असल्यास त्यात त्वरित बदल करा.
- कोणत्याही लिंक्सवर क्लिक करू नका : अनेकांना पैशांचे आमिष दाखवणारे व्हॉट्सॲप मेसेज आणि ई-मेल येतात. असा मेसेज आणि ई-मेलमधील लिंक्सवर क्लिक करू नये. सायबर गुन्हेगार बँक कर्मचारी असल्याचा दावा करत तुमची खासगी माहिती विचारून फसवणूक करतात.
- ॲपला करा अपडेट : सर्व ॲप्ससाठी वेळोवेळी अपडेट जारी केले जाते. याद्वारे ॲपमध्ये नवीन सिक्योरिटी फीचर्स जोडले जातात. त्यामुळे यूपीआय पेमेंट ॲप्सला वेळोवेळी अपडेट करा.
- एकापेक्षा जास्त पेमेंट ॲप्लिकेशनचा वापर टाळा : एकापेक्षा जास्त पेमेंट ॲप्सचा वापर करणे टाळायला हवे. गरज पडली तरीही नेहमी PlayStore आणि App Store वरून केवळ व्हेरिफाइड ॲप्सच इंस्टॉल करा.

## शॉर्ट न्यूज

### सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ

**■ श्रीरामपूर :** राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासकीय खरेदीला ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती आमदार हेमंत ओगले यांनी दिली आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार ओगले यांनी शेतकऱ्यांच्या अनेक महत्वपूर्ण विषयांना स्पर्श केला होता. त्यामध्ये दूध दरवाढ, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा तसेच सोयाबीन व इतर पिकांच्या हमीभावात खरेदीचा मुद्दा होता. अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रव्यवहार करून सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ मिळावी, ही मागणी केली होती.

### महिलेची इमारतीवरून उडी मारून आत्महत्या

**■ शिर्डी :** पतीच्या जाचाला कंटाळून विवाहित महिलेने चार मजली इमारतीच्या टेरेसवरून उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना शिर्डी येथे बुधवारी (दि. १) रात्री घडली. कल्पना विजय वाकळे असे त्या महिलेचे नाव आहे. मयत कल्पना हिचा भाऊ किरण बाबूराव पगारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिर्डी पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मयत महिलेचा पती विजय वाकळे याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

### कांदा लागवडीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**■ शेवगाव :** कांद्याचे एकरी उत्पन्न अधिक घ्यायचे असल्यास रोपांची संख्या योग्य ठेवून व्यवस्थित अंतरावर लागवड करणे गरजेचे असल्याचे प्रगतशील शेतकरी बाळासाहेब काकडे यांनी सांगितले. तालुक्यातील साकेगाव येथे तालुका कृषी विभाग ग्रामस्थांच्यावतीने कांदा लागवड तंत्रज्ञान या विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, साकेगावचे सरपंच चंद्रकांत सातपुते, संतोष उगार, साहेबराव सातपुते आदी उपस्थित होते.

### जातीवाचक शिवीगाळ करत घरात घुसून मारहाण

**■ श्रीगोंदा :** जातीवाचक शिवीगाळ करत घरात घुसून मारहाण केल्याची घटना २७ डिसेंबर रोजी रात्री खांडके (ता. श्रीगोंदा) शिवारात घडली. गौतम रामदास ठोंबे असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी सात जणांविरोधात अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानुसार नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. समीर शौकत देशमुख, बाबा रहमान शेख, रियाज निसार शेख, किरण यमाजी चेमटे, बाळू चेमटे, बंटी बाळू चेमटे, सोमा चेमटे असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### निवडणुकीसाठी सर्वांनी महायुती म्हणून एकत्र या

**■ संगमनेर :** विधानसभा निवडणुकीत आपण सर्वजण महायुती म्हणून एकत्र लढलो आणि संपूर्ण राज्यात मोठा विजय मिळवला. त्याचप्रमाणे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकासुद्धा आपल्याला महायुती म्हणून एकत्र लढायच्या आहेत. त्यासाठी तुम्ही सर्वांनी महायुती म्हणून एकत्र यावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील नांदूर खंदरमाळ येथील खैरदरा येथे श्री खंडोबा महाराज यात्रोत्सवाला आमदार खताळ यांनी भेट देत मंदिरात महाआरती केली. त्यांच्यासमवेत आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते.

# शिक्षण अन् वाचनामुळे माणूस खऱ्या अर्थाने प्रगल्भ होतो

**■ सेवानिवृत्त मुख्याध्यापक गुलाबराब मांगडे यांचे मत**
**■ 'टग्या-टिगीच्या करामती' बालकथा संग्रहाचे प्रकाशन**



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**शिक्षण आणि पुस्तकांचे वाचन यातूनच माणूस खऱ्या अर्थाने प्रगल्भ होतो. त्यासाठी प्रत्येक शाळेत आणि घरोघरी लहान मुलांना सहजपणे वाचता येतील, अशा पद्धतीने पुस्तकांची उपलब्धता असावी, असे मत सेवानिवृत्त मुख्याध्यापक गुलाबराव मांगडे यांनी व्यक्त केले.**

रुईखेल (ता. श्रीगोंदा) येथील शेळके वस्तीवर नववर्षानिमित्त लेखक सचिन चोभे लिखित 'टग्या-टिगीच्या करामती' या बालकथा संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी मांगडे बोलत होते. अध्यक्षस्थानी न्यू आर्ट्स कॉलेजचे मराठी विभागातील प्रा. डॉ. महेबूब सय्यद होते. श्री क्षेत्र वाहिरा येथील संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धीनाथ मेटे महाराज हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. यावेळी गेणा शेळके, दत्तात्रय जगदाळे, संजय महांडुळे, दगडू महांडुळे, सुंदरदास नागवडे, शिक्षक विश्वनाथ महांडुळे, गोरख महांडुळे, उपसरपंच झुंबर महांडुळे, बापूराव भोस, राजेंद्र भोस, सुनील झगडे, संतोष बरस्कार, कैलास गव्हाणे, कवि डॉ. सूर्यकांत वरकड, पत्रकार सुनील चोभे, अविनाश निमसे आदी उपस्थित होते.

डॉ. सय्यद म्हणाले की, विद्यार्थी जीवनात शैक्षणिक अभ्यासक्रमासह अवांतर वाचन करण्याची गोडी असावी. त्यानेच भोवताल आणि जगातील सर्वांगीण माहितीचे आकलन होते. 'टग्या-टिगीच्या करामती' हे पुस्तक अशाच पद्धतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणारे आहे. तर, मेटे महाराज म्हणाले की, मोबाइलच्या काळात आता मुलांना वाचण्यासाठी नवीन व आताच्या जगाची माहिती देणारे साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे. हा बालकथासंग्रह त्याला चालना देणारा आहे.

लेखक सचिन चोभे यांनी सांगितले की, आता आपण कितीही मोठे घर बांधत असलो, तरी घरात वाचन कोपरा विकसित करण्यास विसरलो आहोत. सक्षम भारत देश आणि सजग नागरिक घडवण्यासाठी अगोदर पालकांनी पुस्तकांचे वाचन करावे आणि आपल्या मुलांनाही पुस्तकाची गोडी लागेल, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, या हेतूनेच बालसाहित्यात लेखन सुरू केले आहे. शिक्षक आणि पालकांनी मिळून आता यासाठी मदत करण्याची गरज आहे. स्पर्धेच्या युगात त्याचेही खूप महत्त्व असणार आहे. त्यामुळेच पुढील वर्षभरात आणखी काही पुस्तके प्रसिद्ध करण्याचा मानस चोभे यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन महादेव गवळी यांनी, तर माधुरी चोभे यांनी आभार मानले.

# मतभेद बाजूला ठेवून हिंदू धर्म रक्षणाचे काम करू

## आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे प्रतिपादन

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**



**विधानसभा निवडणुकीमधील माझा विजय हा हिंदू धर्मामुळेच झाला. दोन वर्षांपूर्वी राहुरी तालुक्यात हिंदू बांधवांवर काही जातीवादी समाजकंटकांनी अन्याय केला. त्यावेळी मी मताचे राजकारण न करता धावून गेलो आणि हिंदू धर्म वाचवण्यासाठी काम केले. राजकारणापेक्षा हिंदू धर्म टिकला पाहिजे. आपल्यातील मतभेद बाजूला ठेवून हिंदू धर्म रक्षणाचे काम करू, असे प्रतिपादन आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केले.**

भिंगार येथील श्री शुक्लेश्वर मंदिर परिसरात महेश झोडगे मित्र मंडळातर्फे श्री शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते आमदार शिवाजीराव कर्डिले यांना हिंदू धर्मरक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महेश झोडगे, अमित धाडगे आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ.कर्डिले पुढे म्हणाले की, धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिक एकत्र येत असतात त्या माध्यमातून धार्मिकता जोपासली जाते. राज्यातील महायुतीचे सरकार हे महाराजांच्या धार्मिकतेच्या प्रचार व प्रसारामुळे आले आहे. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून श्री शिव महापुराण कथेचे आयोजन केले असल्यामुळेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण हिंदू धर्म वाढीसाठी काम करीत आहे. आता माझ्यावर मोठी जबाबदारी पडली असून ती मी नक्कीच पार पाडेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**वाचकांच्या लेखणीतून**

# कदरदान! मेहेरबान!!



तमाशा सम्राज्ञी कांताबाई फुलवडेकर हलाकीच्या स्थितीत! अशी करुणाजनक बातमी वाचली (पारनेर दर्शन, १ जानेवारी, बुधवार). शिरूर शहरातील इंदिरानगर झोपडपट्टीतील रहिवाशी. वृध्दत्वावस्थेत खडतर जीवन जगणाऱ्या तमाशा कलाकार कांताबाई फुलवडेकर यांची जीवनगाथा आणि व्यथा पारनेर दर्शनचे प्रतिनिधी सतीश डोंगरे यांनी योग्य शब्दांत मांडली आहे. ती काळजाला पीळ पाडणारी वाटली. जिने एक काळ ५०-६० तमाशा कलावंतांचे पोट भरण्याची व्यवस्था केली होती तिच्याचपुढे आता स्वतःचे पोट भरण्याची भ्रांत उभी राहिली आहे. असे कळते. एक काळ तमाशाच्या माध्यमातून समाजाचे मनोरंजन केलेले अनेक वयोवृध्द कलाकार आज दुर्धर अवस्थेत आहेत. तमाशा सम्राज्ञी कांताबाई फुलवडेकर याही त्यांतीलच एक. पांडुरंग मुळे मांजरवाडीकर यांच्या तमाशातील पवित्र झाली इंद्रायणी वगनाट्यातील इंद्रायणी या नायिकेची भूमिका कांताबाईंनी बेमालूम वठविली म्हणून त्यांना कदरदान पांडुरंग मुळे मांजरवाडीकर यांनी पाच हजार रुपयांचा शालू घेऊन दिला होता, असे कांताबाई फुलवडेकर सांगतात.

शेवटच्या बाजीराव पेशव्यांची एकुलती एक कन्या निधन पावली तेव्हा कोणत्याही वृत्तपत्राने तिची दखल घेतली नाही. मात्र संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी शेवटची वेल सुकली! या मथळ्याचा एक लेख लिहिला होता. तो मी वाचलेला आहे. बाजीरावांची मुलगी, पेशव्यांची कन्या होती एवढीच तिची ओळख होती. येथे तर कांताबाई फुलवडेकर तमाशा सम्राज्ञी आहेत. त्यांचे हलाकीचे जिने त्यांना स्वतःला आणि आपल्या समाजालाही भूषणावह नाही. समाजात सन्मानाने जगता यावे म्हणून महाराष्ट्र शासन, स्थानिक राजकीय नेते आणि समाजातील ऐपतदार व्यक्तींनी कदरदान आणि मेहेरबान होऊन त्यांना आर्थिक साह्य करावे. असे आवाहन करावेसे वाटते.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# शिर्डीतून लवकरच नाईट लँडींग

## केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची शिर्डीत माहिती

**शिर्डी : प्रतिनिधी**



**शिर्डीतील साईबाबा आंतराष्ट्रीय विमाळतळावरुन लवकरच नाईट लँडींग विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. सामान्य साईभक्तांना विमानसेवेचा लाभ घेता यावा यासाठी शिर्डी विमानतळाचा उडाण योजनेत समाविष्ट करणार असल्याची घोषणा केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली.**

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ बोलत होते. ते म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटून शिर्डी विमानतळाबाबतच्या अडचणी सोडवण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार अमित शाह यांनी मागील आठवड्यातच शिर्डी विमानतळासाठी सीआयएसएफचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहे. नाईट लँडींगबाबत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर करून पंधरा दिवसांत शिर्डीतून विमानांची नाईट लँडींग व टेकअप सुरू करण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

६ तारखेला मुंबईत नागरी उड्डाण मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मुख्यमंत्री फडणवीस विमानतळाच्या अडचणी दूर करण्यासाठी ठोस निर्णय घेणार असल्याचे मोहोळ यांनी जाहीर केले.सोलापूर-मुंबई विमानसेवा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही मोहोळ यांनी स्पष्ट केले. विमानतळावर स्वस्त दरात भाविकांना भोजन, नाश्ता देण्याची योजना कोलकाता विनानतळापासून सुरू केली आहे. त्याची व्याप्ती देशातील इतर विमानतळांवर वाढवणार असल्याचेही मोहोळ यांनी सांगितले.

(पान १ वरुन)

### वाल्मिक कराडला कोर्टाचा दणका ! मदतनीस देण्याची मागणी फेटाळली

चालवण्यासाठी खासगी मदतनीस देण्याची मागणी केली होती. मात्र, कोठडीत असल्याने खासगी व्यक्तीचा वापर करता येणार नसल्याचे कोर्टाने स्पष्ट केले. फक्त शासकीय सुविधा देण्याची सूचना देखील कोर्टाने केली.

वाल्मिक कराडने काय म्हटले होते?

वाल्मिक कराडने कोर्टाला केलेल्या विनंतीत म्हटले की, आपल्याला स्लिप एपनिया नावाचा आजार असून या आजारासाठी ऑटो सीपॅप नावाची मशीन विशिष्ट दाबाने वापरण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. ही मशीन चालवण्यासाठी आपल्याला सीआयडी कोठडीत २४ तास मदतनीस देण्यात यावा, अशी विनंती वाल्मिक कराडने केली आहे. वाल्मिक कराडने रोहित कांबळे या मदतनीसाची मागणी केली आहे.

रोहित कांबळेच का?

वाल्मिक कराडने रोहित कांबळेच मदतनीस का हवा, याचे कारणही कोर्टाला दिले आहे. मशीन वापरण्यासाठी रोहीत कांबळेने प्रशिक्षण घेतले असून मशीन चुकीच्या पध्दतीने लावल्यास आपल्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो असेही कराडने म्हटले आहे.

### धनंजय मुंडे, पंकजा मुंडेंचा पत्ता कट?

लावून धरल्यामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

बीडच्या पालकमंत्रीपदावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली आहे. या चर्चेत बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे किंवा त्यांच्या भगिनी मंत्री पंकजा मुंडे यांना न देण्यावर मतैक्य झाल्याची माहिती आहे. विशेषतः बीडमध्ये घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी स्वतः अजित पवार या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारतील, असा दावा एका मराठी वृत्तवाहिनीने केला आहे.

विशेष म्हणजे राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराला दोन आठवड्यांचा कालावधी लोटला आहे. पण अद्याप जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची घोषणा झाली नाही. सत्ताधारी महायुतीमधील घटकपक्षांमध्ये सध्या या प्रकरणी सल्लामसलत सुरू असल्यामुळे या प्रकरणी विलंब होत असल्याची माहिती आहे.

धनंजय मुंडेंनी फेटाळली राजीनाम्याची मागणी

दुसरीकडे, धनंजय मुंडे यांनी आपल्या राजीनाम्याची मागणी फेटाळून लावली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. त्यामुळे मी राजीनामा का द्यावा? असा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांविरोधातील खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा. त्यांना फाशीची शिक्षा दिली जावी अशी मागणी मी यापूर्वीच केली आहे. त्यामुळे कुणी काय बोलावे व कुणाचे काय होणार? अशा प्रश्नांना काहीही अर्थ नाही, असे ते म्हणालेत.


## पारनेर नगरपंचायत, पारनेर

**नायलॉन मांजा बंदीबाबत जाहीर सूचना**

पारनेर नगरपंचायत, पारनेर जिल्हा अहिल्यानगर येथील नगरपंचायत हद्दीतील सर्व दुकाने/संस्था/आस्थापना/मार्केट/संघटना/कार्यालय व व्यक्तींना सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय हरित लवाद(Ngt National Green Tribunal) यांचे आदेश क्र.३८४/२०१६ व ४४२/२०१६ दिनांक १४/१२/२०१६ नुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ५ अन्वये पक्षी व मनुष्यास इजा करणाऱ्या नायलॉन मांजाच्या वाहतूक, विक्री, साठवणूक व वापरास प्रतिबंध घालण्याचे निर्देश दिले असून नायलॉन मांजा विक्री, साठवणूक व वापरणे याबाबत दोषी आढळल्यास दंडात्मक तथा फौजदारी कारवाईची तरतूद असून पारनेर नगरपंचायत हद्दीत कोणीही नायलॉन मांजाच्या वाहतूक, विक्री, साठवणूक व वापरास प्रतिबंध घालण्यात आलेल्या आदेशांचे उल्लंघन केल्यास दोषींवर दंडात्मक तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच नायलॉन मांजाच्या वाहतूक, विक्रीस, साठवणूक व वापरावर पारनेर नगरपंचायत, पारनेर जिल्हा. अहिल्यानगर स्तरावर खालीलप्रमाणे कृती दलाची स्थापना करण्यात आलेली आहे.

| तक्रार निवारणकरीता प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी | प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या संबंधीत तक्रारीकरीता संपर्क क्रमांक |
|---|---|
| श्री. दत्तात्रय श्रीमंदिलकर आरोग्य मुकादम | ९६५७४४२८८१ |
| पारनेर नगरपंचायत, कार्यालय | ०२४८८-२२१५५८ |

सही/- (विनय शिपाई) मुख्याधिकारी | सही/- (प्रियंका औटी) आरोग्य सभापती | सही/- (जायदा शेख) उपनगराध्यक्ष | सही/- (नितीन अडसूळ) नगराध्यक्ष

पारनेर नगरपंचायत पारनेर

## पारनेर नगरपंचायत, पारनेर

**प्लॉस्टिकबंदी बाबत जाहीर सूचना**

पारनेर नगरपंचायत हद्दीतील सर्व दुकाने / संस्था / अस्थापना / कार्यालये / भाजीपाला व फळ विक्रेते तसेच सर्व नागरिक यांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने ऑगस्ट २०२१ मध्ये अधिसूचित केल्याप्रमाणे सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२१ (G.S.R.571 (E) नुसार ३० सप्टेंबर २०२१९ पासून ७५ मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या आणि ३१ डिसेंबर २०२१ पासून १२० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वस्तू वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे, १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक वस्तू वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. त्याकरिता सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरिन (थर्माकोल), मिठाई बॉक्स, आमंत्रण कार्ड व सिगारेट पाकिटे यांची प्लास्टिक आवरणे, प्लास्टिकच्या काड्यांसह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लास्टिकच्या काड्या, प्लास्टिकचे झेंडे, कॅडी कांड्या, आईस्क्रीम कांड्या, प्लास्टिक प्लेट्स, चहाचे कप, ग्लासेस, कटलरी जसे काटे, चमचे, चाकू, पिण्यासाठीचे स्ट्रॉ, ट्रे, ढवळण्या (स्टिरसँ) १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे पीव्हीसी बॅनर्स यावर बंदी आहे. याबरोबरच, महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत खालील गोष्टी प्रतिबंधित आहेत. कंपोस्टे बल प्लास्टिक (कचरा व नर्सरी साठीच्या पिशव्या सोडून), सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्या (कॅरी बॅग्स) हॅण्डल असलेल्या व नसलेल्या, प्लास्टिक डिश, बाउल, कन्टेनर (डबे) वरील वस्तू वर शासनाने बंदी घातलली आहे तरी वरील साहित्याचा वापर, वाहतूक किंबा साठवणूक करू नये अन्यथा महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) नियम २०१६ अंतर्गत महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ व सुधारितचे उल्लंघन केल्यास खालील प्रमाणे दंड आकरण्यात येईल.

| अ.क्र. | गुन्हाचे नाव | दंडाची रक्कम व स्वरुप |
|---|---|---|
| १. | पहिला गुन्हा | रु.५०००/- |
| २. | दुसरा गुन्हा | रु.१०,०००/- |
| ३. | तिसरा गुन्हा | रू.२५,०००/- व ३ महिने कारावास |

**प्लॉस्टिक बंदी व दंडात्मक कारवाई दिनांक ३१/१२/२०२४ पासून सुरू करण्यात आली आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सही/- (विनय शिपाई) मुख्याधिकारी | सही/- (प्रियंका औटी) आरोग्य सभापती | सही/- (जायदा शेख) उपनगराध्यक्ष | सही/- (नितीन अडसूळ) नगराध्यक्ष

पारनेर नगरपंचायत पारनेर

## पारनेर नगरपंचायत, पारनेर

**जाहीर सूचना**

**पारनेर शहरातील सर्व नागरीक, दुकानदार व हातगाडी व्यावसायिक यांना जाहीर सुचना करण्यात येते की, शासन निर्णय स्वमअ- २०१७/प्र.क्र.२५६(१)नवि-३४, दि.०७ सप्टेंबर २०१८ चे शासन निर्णयानुसार 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६' मधील तरतुदी व नगरपरिषद /नगरपंचायती यांच्यासाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य नियम' नुसार खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.**

| अ.क्र. | तपशिल | पहिला प्रसंग | दुसरा प्रसंग | तिसरा प्रसंग | त्यानंतर प्रत्येक प्रसंगी |
|---|---|---|---|---|---|
| १. | विलगीकरण केलेला व वेगळ्या डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा सोपविल्या बद्दल | | | | |
| | १) व्यक्ती | रु.३०/- | रु.६०/- | रु.९०/- | रु.९०/- |
| | २) मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWG) | रु.५००/- | रु.१०००/- | रु.१५००/- | रु.१५००/- |
| २. | १) कचरा जाळणे | रु.३००/- | -- | -- | रु.३००/- |
| ३. | रस्ते/रस्ता दुभाजकात घाण टाकणे, रस्त्यावर, कॅनॉलमध्ये, उघड्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे. | रु.१५०/- | -- | -- | रु.१५०/- |
| ४. | सार्वजनिक ठिकाणे थुंकणे | रु.१००/- | -- | -- | रु.१००/- |
| ५. | उघड्यावर लघवी करणे. | रु.१००/- | -- | -- | रु.१००/- |
| ६. | बांधकाम मटेरियल रस्त्याच्या कडेला/ उघड्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी टाकणे. (COUNSTRUCTION & DEMOLITION) प्रति खेप | रु.५००/- | -- | -- | रु.५००/- |
| ७. | उघड्यावर शौच करणे. | रु.५००/- | -- | -- | रु.५००/- |

**तरी याबाबत पालन न करणाऱ्या नागरिकांकडून कोणतीही सबब ऐकून न घेता शिक्षेची कार्यवाही करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सही/- (विनय शिपाई) मुख्याधिकारी | सही/- (प्रियंका औटी) आरोग्य सभापती | सही/- (जायदा शेख) उपनगराध्यक्ष | सही/- (नितीन अडसूळ) नगराध्यक्ष

पारनेर नगरपंचायत पारनेर

# प्रसार माध्यमे आणि पत्रकारांचे साहित्य क्षेत्राला पाठबळ

## ■ केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे गौरवोद्गार ■ मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सरहदच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे सन्मानित

पारनेर : प्रतिनिधी

**साहित्याची,संस्कृतीची उज्वल परंपरा असलेले राज्य ही महाराष्ट्राची ओळख आहे.आणि ही ओळख कायम ठेवण्याचे,उंचावण्याचे काम राज्यातील प्रसार माध्यमांनी, पत्रकारांनी सातत्याने केले असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय सहकार व विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर ओहोळ यांनी काढले.**

फेब्रुवारी महिन्यात दिल्ली येथे होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्या सरहद संस्थेच्या वतीने राज्यातील विविध माध्यमांच्या प्रतिनिधींचा प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात आला यावेळी मंत्री मुरलीधर ओहोळ बोलत होते.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सरकार्यवाहपदी नियुक्ती झाल्याचे पत्र यावेळी अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या वतीने मंत्री मोहोळ यांना देण्यात आले. पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. मानपत्र, स्मृती चिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरूप होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार,सरहदचे अध्यक्ष संजय नहार, डॉ. सतीश देसाई, शैलेश पगारिया,सचिन ईटकर व्यासपीठावर उपस्थित होते.तर श्रोत्यांमध्ये प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक प्रविण तरडे,अभिनेता रमेश परदेशी,सरहदचे आंतरराष्ट्रीय समन्वयक डॉ.सतिष देसाई,सरहदच्या कला शाखा व मराठी विभागाच्या प्रमुख डॉ.वंदना चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीचा मंडळाचे सदस्य दिनेश औटी,विजय कोलते, मंगेश वाघमारे, कौस्तुभ वाघमारे आदी उपस्थित होते.



■ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सरहदच्या वतीने संजय वाघमारे यांना केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### माझी भूमिका कार्यकर्त्याची

विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी आणि साहित्याची भूमी असलेल्या पुण्याने देशात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिल्लीमध्ये होत असलेल्या आगामी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात माझी भूमिका कार्यकर्त्याची असणार आहे.दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या मराठी माणसाच्या आणि पुणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान आहे.

**मुरलीधर मोहोळ,**
केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री (दिल्ली).

### हा पारनेर तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान

पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने,पारनेर महाविद्यालयाच्या सहकार्याने गेल्या दहा वर्षांपासून राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते.त्याचबरोबर साहित्य, संस्कृतीविषयक विविध उपक्रम राबवण्यात येतात.साहित्याच्या प्रांतातील विविध घडामोडी वृतांकनाच्या माध्यमातून ग्रामीण वाचकांपर्यंत पोहचवण्यात येतात.त्याचीच दखल घेत सरहदच्या वतीने सन्मानित करण्यात आले.हा पारनेर तालुक्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान आहे.

**संजय वाघमारे,** संस्थापक अध्यक्ष
पारनेर तालुका पत्रकार संघ.

### पारनेर दर्शनचे संपादक देवीदास आबूज यांचाही सन्मान

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सरहदच्या वतीने पारनेर दर्शनचे संपादक देवीदास आबूज यांनाही हा सन्मान जाहीर झाला आहे.७ जानेवारी रोजी पारनेर तालुका पत्रकार संघ, पारनेर महाविद्यालय व सरहदच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनात आबूज यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

### जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पाठबळ

पारनेर तालुका पत्रकार संघाचे विविध साहित्यविषयक उपक्रम अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पाठबळामुळे तसेच तत्कालीन प्राचार्य डॉ रंगनाथ आहेर,पारनेर महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ.तुकाराम थोपटे,अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या सहकार्यामुळे हा पुरस्कार पारनेर तालुका पत्रकार संघाला मिळण्यास मदत झाली.

### मराठी माणूस एक होत आहे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे एक असे व्यासपीठ आहे जेथे महाराष्ट्राची व्यापक भूमिका मांडली जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर दिल्लीत होणारे हे पहिले संमेलन आहे. दिल्लीत संमेलन आयोजित करण्याची संधी सरहद पुणेला मिळाली आहे, याचा आनंद आहे. दिल्लीत होणाऱ्या संमेलनामागे मराठी माणूस एक होत आहे, ही संकल्पना जपली जात आहे आणि या संपूर्ण प्रक्रियेत विविध प्रसार माध्यमांचा मोलाचा सहभाग आहे.या सहभागामुळे आम्हाला काम करत राहण्याची उर्जा मिळते.

**संजय नहार,** अध्यक्ष,सरहद,पुणे.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमास प्रारंभ

## पारनेर महाविद्यालयात वाचन पंधरवडा




■ वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पारनेर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची शपथ दिली.

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील जिल्हा मराठा शिक्षण प्रसारक समाज संस्थेच्या न्यू आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये राज्य शासनाच्या निर्णयानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास १ जानेवारीपासून प्रारंभ झाल्याचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी सांगितले.**

१ ते १५ जानेवारी हा पंधरवडा दरवर्षीप्रमाणे यंदाही वाचन संकल्प हा उपक्रम राबविण्यास पारनेर महाविद्यालयात प्रारंभ झाला. शासन आदेशानुसार दि.२९ डिसेंबरपासून ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथ प्रदर्शन, सार्वजनिक ग्रंथालयास भेट, पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन, सामुहिक वाचन आदी उपक्रम राबविण्यात आल्याचे प्राचार्य मतकर यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रेय घुंगार्डे, सर्व शाखा प्रमुख, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमोच आयोजन ग्रंथपाल डॉ. भाउसाहेब शेळके, ग्रंथालय लिपिक नामदेव ठाणगे व ज्योती पतके, नंदिनी चव्हाण, दत्तात्रय पळसकर, कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी केले. सावकार काकडे यांनी आभार मानले.

### विविध कार्यक्रमांचे आयोजन

दि.१६ जानेवारीपर्यंत लेखक व विद्याथ वाचन संवाद, पुस्तक पुनरावलोकन, पुस्तक परिक्षण, कथा-कथन स्पर्धा, ग्रंथ दिंडी आदी कार्यमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**डॉ. भाऊसाहेब शेळके**
ग्रंथपाल

### सामूहिक वाचन

१ जानेवारी रोजी सामुहिक वाचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सुमारे ३०० वाचकांनी सहभाग नोंदविला. त्यात विद्यार्थ्यांनी नरेंद्र जाधव लिखित आमचा बाप आणि आम्ही व विश्वास नांगरे यांचे मन मे है विश्वास या पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. मतकर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाबाबतची प्रतिज्ञा दिली.

# अळकुटीत राज्यस्तरीय निबंध, वकृत्व स्पर्धा

## डॉ. बाळासाहेब विखे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य

अळकुटी : प्रतिनिधी



**अळकुटी महाविद्यालय, सहकार महर्षी बाळासाहेब बाबर सार्वजनिक वाचनालय वडेनर बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने अळकुटी येथे राज्यस्तरीय महाविद्यालयीन निबंध व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहीती पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर यांनी दिली.**

यासंदर्भात बाबर यांनी सांगितले की दि. ९ जानेवारी अखेर निबंध स्पर्धा घेण्यात येणार असून स्वहस्ताक्षरातील एक ते दिड हजार शब्द मर्यादेतील निबंध अळकुटी महाविद्यालयाकडे पाठवावेत. दोन्ही स्पर्धांसाठी १५० रूपये प्रवेश फी आकारली जाईल. सोमवार दि.१३ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता वकृत्व स्पर्धांचे उद्घाटन होईल. सोमवारी दुपारी २ वाजता दोन्ही स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते बक्षिस वितरण होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दिनेश बाबर हे भुषविणार आहेत. यावेळी प्रवरा शिक्षण संस्थेच्या तांत्रीक महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रदिप दिघे, जिल्हा मराठाचे विश्वस्त सिताराम खिलारी, सुनील थोरात, राहुल शिंदे, सचिन वराळ, भाऊसाहेब डेरे हे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

### स्पर्धेसाठी विषय

**वकृत्व स्पर्धा**

देह वेचावा कारणी - डॉ. बाळासाहेब विखे, वाचार तर वाचाल ! शिकाल तर टिकाल, लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी

**निबंध स्पर्धा**

पदमभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे जीवन व कार्य, डॉ. ए पी जे अब्दुल कलाम आणि पुस्तकांचे महत्व, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत साहित्य व महाविद्यालयीन विद्यार्थी

**बक्षिसे**

बाबर वाचनालयातर्फे ३ हजार ३३३ रूपयांचे प्रथम, २ हजार २२२ रूपयांचे व्दितीय, १ हजार १११ रूपयांचे तृतीय पारितोषिक तसेच ५५५ रूपयांचे दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. सर्व विजेत्यांना स्मृतीचिन्ह तसेच प्रमाणपत्रही देण्यात येईल.

# निर्भय कन्या अभियान कार्यशाळा मार्गदर्शक

## प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांचे प्रतिपादन

अळकुटी : प्रतिनिधी

**महाविद्यालयीन विद्यार्थिनींना आत्मबल वाढविण्यासाठी व भयमुक्त करण्यासाठी निर्भय कन्या अभियान कार्यशाळा मार्गदर्शक ठरते असे प्रतिपादन प्राचार्य कुंदा कवडे यांनी केले.**




लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे विद्यार्थी विकास मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. यावेळी प्रा.कवडे बोलत होत्या.

यावेळी प्रा.कवडे म्हणाल्या की,मुलींच्या मनामधील भीती दूर करून त्यांना समाजात स्वच्छंदपणे जगता यावे म्हणूनच पोलीस अधिकारी, डॉक्टर, वकील, कराटे तज्ञ आदींचे व्याख्याने व प्रशिक्षण सत्र आयोजित केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्र, अळकुटी येथील डॉ. सरिता खोसे यांनी आपल्या व्याख्यानातून मुलींनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. तसेच द्वितीय व्याख्याते श्री ज्ञानेश्वर बबन शिरोळे, पी.एस.आय., नागपूर पोलीस स्टेशन यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे कायदेविषयक माहिती विद्यार्थिनींना दिली. तर कार्यक्रमाच्या तृतीय व्याख्याता प्रा. वैशाली बांगर, फिजिकल डायरेक्टर व कराटे प्रशिक्षक यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत कराटे विषयक प्रात्यक्षिके शिकवली व आत्मसंरक्षणाचे धडे दिले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. अमोल नालकर, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, प्रा. सुषमा करकंडे, डॉ. शांता थोरात, प्रा. पूजा वैरागर, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. सुनिता शिंदे, प्रा.स्वाती फापाळे, प्रा.शर्मिष्ठा बोरूडे, प्रा.संजय जाधव, प्रा. संदीप गेटम, प्रा.रावसाहेब झावरे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. राजाराम गोर्डे, प्रा.मच्छिन्द्र बेलोटे, प्रा.ऋषिकेश गीते, प्रा.पांडुरंग उघडे सर, प्रा.सचिन बलसाने, लेखापाल सूर्यमाला भोर, कार्यालय अधीक्षक गोरख घोलप आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ७० हून अधिक विद्यार्थिनी उपस्थित होत्या.याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. प्रियंका दिवटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, भूगोल विभागप्रमुख प्रा.सुनिता जाधव यांनी सूत्रसंचालन केले तर इतिहास विभागप्रमुख प्रा. अर्जुन चाटे यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धेचे १८ जानेवारीला आयोजन

## नागेश्वर मित्र मंडळाचा उपक्रम । पाणी वाचवा, जीवन वाचवा चा संदेश

पारनेर : प्रतिनिधी

**नागेश्वर मित्र मंडळ पारनेर वतीने आयोजित राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धेचे शनिवारी १८ जानेवारीला आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे प्रमुख अश्विन कोल्हे, कल्याण थोरात, राहुल सोंडकर, नरेंद्र शिंदे , नजीर तांबोळी, वैभव बडवे , तेजस औटी यांनी दिली. स्पर्धेचे यंदा २३ वे वर्ष आहे.**




नागेश्वर मित्र मंडळाचे वतीने स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी पारनेर मॅरेथॉन स्पर्धे चे आयोजन करण्यात येते.शनिवारी १८ जानेवारीला पारनेर बाजारतळ मधून स्पर्धा प्रारंभ होणार आहे.स्पर्धासाठी सह्याद्री एजन्सीचे प्रमुख अश्विन कोल्हे, नगरपंचायत पारनेर,गौरव उद्योग समूहाचे प्रमुख अर्जुन भालेकर,जय माता दि उद्योग समूहाचे प्रमुख मारूती रेपाळे, प्रसिद्ध सी.ए. कौस्तुभ काकडे असोसीएटस, मातोश्री कन्स्ट्रक्शनचे प्रताप अंबुले,स्व. राजाभाऊ देशमुख मित्र मंडळ,गायकवाड आयुर्वेदिक औषधी , पारनेर पंचायत समिती शिक्षण विभाग, सह प्रायोजक राहणार आहेत.

स्पर्धासाठी खुल्या गटात पुरूषासाठी असून यात राज्यातील स्पर्धकांना प्रवेश दिला जाणार आहे. पहिली ते चौथी मुले,मुली, पाचवी ते सातवी मुले मुली आठवी ते दहावी मुले मुली असे सहा गट असुन या शालेय गटात फक्त पारनेर तालुक्यातील स्पर्धकांना प्रवेश दिला जाणार असल्याचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के,कल्याण थोरात,गणेश कावरे, अश्विन कोल्हे, धीरज महांडुळे यांनी सांगितले. स्पर्धेसाठी १२ जानेवारी पर्यंत नावनोंदणी करण्याचे आवाहन मंडळाचे प्रमुख नजीर तांबोळी,डॉ. नरेंद्र मुळे, योगेश वाघ,प्रमोद गोळे, विजय इंगळे,अनिकेत औटी, उदय शेरकर, दत्ता शेरकर, सचिन शिंदे, नरेंद्र शिंदे, वैभव बडवे,नवनाथ गाडगे, राहुल सोंडकर, आकाश जोशी, सुहास मोढवे,वैभव पठारे, दिगंबर शिंदे, गणेश डेरे, इंद्रजित देशमुख, सतिष इंगळे,सुनील कावरे,आकाश शेळके, प्रमोद शेळके, संतोष भोर,प्रा.तुषार ठुबे, , वैभव पानसरे, दत्ता वाटमारे, सारंग बोरूडे, , किरण शिंदे, , सुभाष कावरे, वैभव पानसरे,समृद्ध मुळे,प्रा संकेत ठाणगे यांनी केले आहे.

### अण्णांच्या पेन्शनमधून विजेत्यांना ट्रॉफी

पारनेर मॅरेथॉन स्पर्धा गेल्या २२ वर्षे पासून सुरू असून स्पर्धे तील बक्षीस विजेत्यांना ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या निवृत्ती वेतनामधून दरवर्षी ट्रॉफी देण्यात येते. स्पर्धेसाठी पोलिस निरीक्षक समीर बारवकर, पारनेर महाविद्यालय राष्ट्रीय छात्र सेना पथक, इंदिरा गांधी नर्सिंग कॉलेज परिचारीका पथक, पारनेर ग्रामीण रूग्णालय,१०८ रूग्णवाहिका आदींनी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

# गणित विज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक घडतील - खा. नीलेश लंके

## भाळवणीत तालुकास्तरीय विज्ञान-गणित-पर्यावरण प्रदर्शन

भाळवणी : प्रतिनिधी

**तालुका विज्ञान-गणित-पर्यावरण प्रदर्शनातून डॉ. अब्दुल कलामांप्रमाणे बाल वैज्ञानिक घडतील असा विश्वास खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**



पंचायत समितीचा शिक्षण विभाग, पारनेर तालुका विज्ञान-गणित संघटना व महात्मा फुले विद्यालयाच्या वतीने ५२ वे तालुका स्तरीय विज्ञान-गणित-पर्यावरण प्रदर्शनाचे १ ते ३ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे खा. लंके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपल्या खास शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. रयत शिक्षण संस्थेचे सदस्य मा. आ. दादाभाऊ कळमकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.
यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, आतापर्यंत जे महान शास्त्रज्ञ, गणित तज्ञ झाले ते ग्रामिण तसेच अतिशय दुर्गम भागातून पुढे आलेले आहेत. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी ग्रामिण भागातील शिक्षणातही सामर्थ असल्याचे सिध्द केले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श डोळयापुढे ठेउन आपणही काहीतरी निर्माण करण्याचे ध्येय ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी ज्ञानदेव पांडूळे, नवनाथ बोडखे, सीमा राणे, दीपक फापाळे, गोरखशेठ रोहोकले, संभाजी रोहोकले, संदीप रोहोकले, कांतीलाल ढवळे यांच्यासह सर्व पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

सोपान गवते यांनी प्रास्ताविक केले. सीमा राणे, नवनाथ बोडखे संभाजी रोहोकले, सरपंच लिलाबाई रोहोकले, बी एस नाईकवाडी यांची यावेळी भाषणे झाली. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी सदानंद सोनावळे, तौसीन शेख व शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक नृत्य सादर केले.

### विज्ञाननिष्ठ व्हा

भारतात पुर्वी अनेक वैज्ञानिक, गणित तज्ञ होऊन गेले. सध्या आपण मागे पडलो असूनर विद्यार्थ्यांनी विज्ञान निष्ठ होण्याची आवष्यकता आहे.

**ज्ञानदेव पांडूळे**

### तंत्रज्ञान आत्मसात करा

तरूण पिढीने जुने विचार सोडून तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. विज्ञानामुळे मोठी प्रगती झाली असून त्यामुळे वाढलेले प्रदुशन कमी करण्यासाठी प्रत्येकाने एक झाड लाऊन पर्यावरणाच्या संतुलनास हातभार लावावा.

**दादाभाऊ कळमकर**
मा. आमदार

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com